## L. C. BILL No. VI OF 2023.

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA (URBAN AREAS) PROTECTION AND PRESERVATION OF TREES ACT, 1975

## सन २०२३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ६.

**महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

सन १९७५ चा महा. ४४.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :-

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम, २०२३ असे म्हणावे.

(शा.म.मु.) एचबी-२८१५-१ (१५५—३-२०२३)

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नमूद करेल अशा दिनांकास अंमलात येईल.

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४४ याच्या कलम ८ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ याच्या कलम ८ मध्ये —

(क) पोट-कलम (२) मधील, "वृक्ष अधिकाऱ्यांकडे" या मजकुराऐवजी, "वृक्ष प्राधिकरणाकडे" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम ३ मधील :—

(एक) खंड (अ) मध्ये "किंवा यथास्थिती, पोट-कलम (६) मध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्याला" हा मजकूर वगळण्यात येईल.

(दोन) खंड (अ-१) मध्ये "पोट-कलम (६) मध्ये निर्दिष्ट केलेला अधिकारी किंवा, यथास्थिती," हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (६) वगळण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ च्या कलम ८ मध्ये सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ अन्वये सुधारणा करून झाडे तोडण्याची परवानगी घेण्याकरिता करावयाचा लेखी अर्ज वृक्ष प्राधिकरणाऐवजी वृक्ष अधिकाऱ्यांकडे करण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच, तोडावयाचे प्रस्तावित केलेल्या झाडांची संख्या पंचवीस किंवा त्यापेक्षा कमी असल्यास, अशा प्रकरणांमध्ये वृक्ष प्राधिकरणाचे सर्व कार्ये व अधिकार हे महानगरपालिका आयुक्त किंवा नगरपरिषदेचा मुख्य अधिकारी किंवा यथास्थिती प्राधिकरणाचा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा असेल अशी तरतूद करण्यात आली आहे.

मुंबई-पुणे, नागपूर ही शहरे आर्थिक उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणात उत्सर्जन, कचरा, प्रदूषणकारक घटक निर्माण करतात. या शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात ऊर्जा वापरली जाते आणि पर्यावरणावर मोठे कार्बन फूटप्रिंट सोडले जातात. अशा परिस्थितीत या शहरांची आर्थिक क्षमता कायम ठेवून पर्यावरण संवर्धन करणे व पर्यावरणाचे संतुलन राखणे याकरिता या शहरात सद्यःस्थितीत अस्तित्वात असलेले हरित क्षेत्रे, खारफुटी जंगले, विविध वनस्पती आणि वृक्षांचे संवर्धन करणे आवश्यक आहे. तथापि, तोडावयाचे प्रस्तावित केलेल्या झाडांची संख्या पंचवीस किंवा त्यापेक्षा कमी असल्यास अशा प्रकरणांमध्ये निर्णय घेण्याचे आणि कर्तव्य पार पाडण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्त किंवा नगरपरिषदेचा मुख्य अधिकारी किंवा यथास्थिती प्राधिकरणाचा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले असल्याने वृक्ष प्राधिकरणावर सदस्य म्हणून कार्यरत असलेल्या निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींच्या अधिकारावर अप्रत्यक्षरित्या गदा येत असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा प्रकारे अधिकारीस्तरावर पंचवीस किंवा त्याहून कमी झाडे तोडण्यास परवानगी देण्याचे अधिकार देण्यात आल्याने शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होऊन पर्यावरणाला गंभीर धोका निर्माण झाला आहे.

तसेच, वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचे अधिकार, अधिकारीस्तरावर देण्यात आल्याने ज्या प्रयोजनासाठी वृक्ष प्राधिकरण स्थापन करण्यात आले होते. त्याचे मूळ उद्दिष्ट साध्य होऊ शकणार नाही.

अशा परिस्थितीत राज्यातील मोठ्या शहरांचे आरोग्य जपण्याच्या दृष्टीने व पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या दृष्टीने तसेच, वृक्ष प्राधिकरण स्थापन करण्यामागील मूळ उद्देश ठेवण्याकरिता व वृक्ष प्राधिकरणावरील सदस्यांचे (निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींचे) अधिकार संरक्षित करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ यात आवश्यक सुधारणा करणे इष्ट झाले आहे.

वरील उद्दिष्टे साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक १७ जानेवारी, २०२३.

**अंबादास दानवे,**
प्रभारी सदस्य.

## श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचे सन २०२३ चे वि. प. विधेयक क्रमांक ६–महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन विधेयक, २०२३ याचे परिशिष्ट.

## महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ यातील उतारे)
## (सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४)

**१.** ते **७.** * * * *

**८.** (१) * * * * झाडे तोडण्यावरील निर्बंध.

(२) नागरी स्थानिक प्राधिकरणाचा अधिकारी किंवा राज्य सरकारचे किंवा केंद्र सरकारचा अधिकारी यांसह कोणत्याही व्यक्तीने झाड तोडावयाचे योजल्यास ती त्याबाबतीत परवानगीसाठी **वृक्ष अधिकाऱ्याकडे** लेखी अर्ज करील. अर्जासोबत, जे झाड तोडावयाचे असेल त्या झाडाचे वर्णन व स्थिती दर्शविणारा जागेचा नकाशा आणि ते झाड तोडण्याची कारणे जोडील.

“परंतु, जेव्हा मोठ्या प्रमाणात झाडे पाडण्याचे प्रस्तावित केले असेल त्याबाबतीत, संबंधित संकल्पचित्रासाठी, पाडणे आवश्यक असलेल्या झाडांच्या संख्येसह पर्यायी संकल्पचित्र, अर्जासोबत सादर करण्यात येईल.”.

(३) (अ) असा अर्ज मिळाल्यावर, वृक्ष अधिकारी,—

(एक) किमान एका स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहिरात देऊन जाहीर नोटीस देईल;

(दोन) तोडावयाच्या झाडांच्या ठळक भागावर अशी नोटीस चिकटवील;

(तीन) झाडाचे व्यक्तिशः निरीक्षण करील; आणि

(चार) चौकशी करील.

“(पाच) जर पुरातन (हेरीटेज) वृक्ष पाडावयाचा असेल तर, जाहिरातीमध्ये विनिर्दिष्टरीत्या तसे नमूद करावे; आणि

(सहा) शासनाकडून अधिसूचित करण्यात येईल अशा निकषानुसार व पद्धतीनुसार पाडावयाच्या झाडाचे वय निर्धारीत करणे.”;

वृक्ष' अधिकारी, सात दिवसांपेक्षा कमी नसेल इतक्या दिवसांचा, हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी संपल्यानंतर, प्राप्त झालेल्या हरकती व सूचना, कोणत्याही असल्यास, त्यांसह आपला अहवाल, वृक्ष प्राधिकरणाला किंवा, **यथास्थिति, पोट-कलम (६) मध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्याला** सादर करील :

परंतु, वृक्ष अधिकारी, अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून बारा दिवसांच्या कालावधीच्या आत आपला अहवाल सादर करील :

परंतु आणखी असे की, अर्जदाराने वृक्ष अधिकाऱ्याकडून अहवाल सादर करण्याच्या आवश्यकतेसाठी पर्याप्त ठरेल अशा नागरी स्थानिक प्राधिकरणाने विकसित केलेल्या माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत यंत्रणेचा वापर करून, तोडावयाच्या झाडांच्या प्रतिमा व तपशील सादर केल्यास, वृक्ष अधिकाऱ्याने झाडाचे प्रत्यक्ष निरीक्षण करणे आवश्यक नसेल :

परंतु तसेच, जर वृक्ष प्राधिकरणाच्या किंवा, यथास्थिति अधिकाऱ्याच्या मते, ते झाड मेलेले असेल किंवा त्यावर रोग पडला असेल किंवा वादळवाऱ्याने झाड पडले असेल तर, किंवा त्यामुळे जीवितास किंवा मालमत्तेस धोका असल्यास, किंवा त्यामुळे वाहतुकीस अडथळा होत असल्यास तर, अशी परवानगी नाकारणार नाही; आणि अशा परवानगीविरुद्ध कोणताही आक्षेप घेण्यात आलेला असेल तर, ती बाब पुनर्विचारासाठी वृक्ष प्राधिकरणासमोर किंवा अधिकाऱ्यासमोर मांडण्यात येईल आणि जिने आक्षेप घेतला असेल अशा व्यक्तीला तिचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, दोन आठवड्यांच्या आत त्यावर निर्णय घेण्यात येईल.

(अ-१) **पोट-कलम (६) मध्ये निर्दिष्ट केलेला अधिकारी किंवा, यथास्थिति,** वृक्ष प्राधिकरण, अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या कालावधीच्या आत सशर्त किंवा विनाशर्त परवानगी देईल किंवा ती नाकारील.'';

''परंतु, जेव्हा पाच वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वयाची दोनशे पेक्षा अधिक झाडे पाडण्याचे प्रस्तावित असेल तेव्हा, अशा बाबतीत, वृक्ष प्राधिकरण, सदर प्रकरण, त्याच्या अहवालासह व शिफारशींसह महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाकडे निर्दिष्ट करील :

परंतु आणखी असे की, जेव्हा पाडण्याचे प्रस्तावित केलेले झाड हे, पुरातन (हेरीटेज) वृक्ष असेल तेव्हा, अशा बाबतीत, वृक्ष प्राधिकरण, किंवा यथास्थिति, वृक्ष अधिकारी, सदर प्रकरण, त्याच्या अहवालासह व शिफारशींसह, महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाकडे निर्दिष्ट करील :

परंतु तसेच, वृक्ष प्राधिकरण, किंवा यथास्थिति, वृक्ष अधिकारी, पाडावयाच्या झाडांची संख्या दोनशे पेक्षा कमी ठेवता यावी म्हणून भूविकास किंवा अन्य कोणताही प्रकल्प, लहान-लहान भागांमध्ये उप-विभाजित केला जाणार नाही याची खात्री करील.'';

(ब) * * * *

(४) व (५) * * * *

(५अ), (५ब) व (५क) * * * *

''(६) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, तोडावयाचे प्रस्तावित केलेल्या झाडांची संख्या पंचवीस किंवा त्यापेक्षा कमी असल्यास, अशा प्रकरणांमध्ये, वृक्ष प्राधिकरणाची सर्व कार्ये व अधिकार हे, महानगरपालिका आयुक्त किंवा नगर परिषदेचा मुख्य अधिकारी, किंवा, यथास्थिति, प्राधिकरणाचा मुख्य कार्यकारी अधिकारी वापरील.'';

**९.** ते **२२.** * * * *

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ६.]**

**[महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम,
१९७५ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.]**

**[श्री. अंबादास दानवे,**
प्रभारी सदस्य.]

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.